जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JAN 2025

लोकमत

# 'युजीसी'करिता डी. टी. शिर्केंच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन

## अधिसूचना, मार्गदर्शक तत्त्वे यांचा करणार अभ्यास

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे निर्गमित अधिसूचना, मार्गदर्शक तत्त्वे यांचा अभ्यास करून शासनास अभिप्राय सादर करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे सातत्याने शैक्षणिक अर्हता, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने व इतर बाबींसंदर्भात वेगवेगळ्या मार्गदर्शक सूचना, तसेच नियामक मसुदे तयार करून निर्गमित करीत असतात. नवनवीन मसुद्यांची व नियामक बदलांची वारंवारिता वाढली आहे. अशी बदलणारी नियमने व मार्गदर्शक तत्त्वे विद्यापीठ व महाविद्यालयीन उच्च शिक्षण व्यवस्था व रचनेवर आमूलाग्र व दीर्घकालीन परिणाम करणारी ठरणार आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने प्रस्तावित मसुद्याबाबत सजग असणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून तयार करण्यात आलेल्या अभ्यासगटात आजी व माजी कुलगुरू, शिक्षणतज्ज्ञ, प्राचार्य, संस्थाचालक या गटातून निवडक खालील सदस्यांची समिती स्थापन केली आहे. समितीकडून विश्लेषणात्मक चर्चा करून चर्चेतून तयार होणारा शिफारस अहवाल शासनास सादर केला जाणार आहे. सदरचा अहवाल राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोगास पाठवेल.

समिती अध्यक्षपदी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची नियुक्ती केली आहे; तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर हे सदस्य असतील. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. डी. कुलकर्णी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही. एल. माहेश्वरी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांच्यासह अन्य आठ सदस्यांची निवड केली आहे.

31 JAN 2025 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गतिशीलता आणि स्वावलंबन हा गांधींचा चरख्यामागील विचार

## डॉ. सुनीलकुमार लवटे : दोन पुस्तकांचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क



शिवाजी विद्यापीठात गुरुवारी डॉ. दशरथ पारेकर अनुवादित 'गांधी : एक माणूस' या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. दशरथ पारेकर, डॉ. सुनीलकुमार लवटे आणि डॉ. प्रकाश पवार उपस्थित होते.

**कोल्हापूर** : महात्मा गांधी यांनी चरख्याच्या माध्यमातून नागरी समाजाची प्रतिष्ठापना करण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांच्या स्वावलंबनासाठी आणि देशाच्या विकासासाठी गांधीजींनी अनेक प्रयोग केले. गतिशीलता आणि स्वावलंबन हा चरख्यामागचा खरा विचार आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी गुरुवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्राद्वारे महात्मा गांधीजींच्या स्मृतिदिनानिमित्त महात्मा गांधी सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने 'चरखा' या विषयावर डॉ. लवटे यांचे व्याख्यान झाले.

या वेळी डॉ. अभय बंगलिखित 'आजचे शिक्षण आणि महात्मा गांधींचे उपाय' आणि डॉ. दशरथ पारेकर अनुवादित व संपादित 'गांधी : एक माणूस' या पुस्तकांचे प्रकाशन झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. लवटे म्हणाले, गांधीजींनी चरखा हे आपल्या स्वराज्याचे साधन म्हणून स्वीकारले. १९०८ साली गांधीजींनी चरख्याला विचारांचे केंद्र बनविले. चरख्याला गांधींनी शेतकऱ्यांचे साधन मानले. प्रत्येक गोष्टीला मूल्य असते हे गांधीजींना मान्य होते. भारतीय अर्थव्यवस्था समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी बारा बलुतेदार आणि अठरा आलुतेदार यांच्या जीवनाचा अभ्यास केला पाहिजे. गांधी विचारांवर छोटे-छोटे अभ्यासक्रम सुरू झाल्यास आजचा तरुण स्वावलंबी आणि उद्योजक बनेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. मोसिम पठाण यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुखदेव उंदरे यांनी आभार मानले. कार्यक्रमास ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुरेश शिपूरकर, डॉ. नंदा पारेकर उपस्थित होते.

31 JAN 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'होय होय वारकरी' पुस्तकात वारकरी परंपरांचा चिकित्सक वेध

## ▪ साहित्यिक प्रा. प्रवीण बांदेकर यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

वारकरी संप्रदायाच्या वाटचालीचा आणि परंपरांचा वर्तमानकालीन परिप्रेक्ष्यातून वेध घेण्याचा प्रयत्न बंडगर यांनी या पुस्तकात केला आहे. केवळ कौतुक करणारे न लिहिता अत्यंत परखडपणे सत्य समोर आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. वारकरी संप्रदायाच्या परंपरांचा चिकित्सक वृत्तीने वेध घेणारे 'होय होय वारकरी' हे मराठीतील एक महत्वाचे पुस्तक आहे, असे मत साहित्यिक प्रा. प्रवीण बांदेकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाचे संत तुकाराम अध्यासन आणि मराठी अधिविभाग यांच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त ह.भ.प. ज्ञानेश्वर बंडगर लिखित 'होय होय वारकरी' या ग्रंथाविषयी आयोजित चर्चेत ते बोलत होते. चर्चेत संत साहित्याचे अभ्यासक डॉ. श्रीरंग गायकवाड आणि प्राचार्य गोविंद काजरेकर यांनीही सहभाग घेतला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उद्घाटक म्हणून उपस्थित होते. ग्रंथाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्रा. बांदेकर म्हणाले, वारकरी संप्रदायातील चांगल्या गोष्टी मांडतानाच वारकरी संप्रदायाच्या आडून समाजमन कलुषित करणाऱ्या प्रवृत्तींचाही शोध ते घेतात. काळाच्या ओघात वेळोवेळी दडविल्या गेलेल्या गोष्टीही पुराव्यानिशी प्रकाशात आणतात.

संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. श्रीरंग गायकवाड म्हणाले, जिथला नागरिक वारी करतो, तो महाराष्ट्र; आणि सर्व जातीधर्मांचे लोक एकत्र यावेत, याचे तत्वज्ञान सांगणारा तो महाराष्ट्र धर्म, असे वारकरी संप्रदाय आणि महाराष्ट्राचे अभिन्न नाते आहे. सहभोजनाची परंपरा वारकरी संप्रदायाने रुजविली. संतांनी लोकांना जोडून ठेवण्याचे काम सातत्याने केले. ज्ञानेश्वरी, भागवत आणि तुकारामांची गाथा हे तीन ग्रंथ अवघ्या मानवतेचे सारस्वरुप आहेत. अस्पृश्यतेसह कर्मकांडांची चिकित्सा करीत सर्वांना सामावून घेणारा असा वारकरी संप्रदाय आहे. या संप्रदायाच्या समग्र गुणवैशिष्ट्यांची अतिशय अभ्यासपूर्वक मांडणी बंडगर यांनी या पुस्तकात केली आहे.

प्राचार्य गोविंद काजरेकर म्हणाले, सांस्कृतिक धुरिणत्व भौतिक, बौद्धिक आणि सांस्कृतिक परिवर्तनासाठी आवश्यक असते. हे धुरिणत्व वारकरी संप्रदायाकडे संत ज्ञानेश्वर यांच्यापासून ते नामदेव, तुकाराम यांच्याकडून आले. बंडगर यांनी बहुजनवादी परिप्रेक्ष्यातून या साऱ्याची मांडणी पुस्तकात केली आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, समतेचा विचार प्रवाहीपणे सर्वदूर पसरविणारा वारकरी संप्रदाय म्हणजे तत्कालीन समाजातील एक विद्यापीठच होते. बंडगर यांनी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाच्या माध्यमातून संतसाहित्याला आणखी योगदान द्यावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी डॉ. प्रभंजन माने, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. मनोहर वासवानी आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : मनोगत व्यक्त करताना 'होय होय वारकरी' या पुस्तकाचे लेखक ह. भ. प. ज्ञानेश्वर बंडगर . सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. बांदेकर, प्राचार्य गोविंद काजरेकर , डॉ. रणधीर शिंदे .

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JAN 2025
पुढारी

# विद्यापीठात महात्मा गांधींसह हुतात्म्यांना अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्यासह हुतात्म्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठातील सर्व प्रशासकीय कक्ष तसेच विविध अधिविभागांत महात्मा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. प्रशासनातर्फे मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीवरून सकाळी भोंगा वाजविण्यात आला. त्यानंतर ११ वाजता सर्वांनी स्तब्ध उभे राहून दोन मिनिटे मौन पाळून महात्मा गांधी यांच्यासह हुतात्म्यांचे स्मरण केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JAN 2025
सकाळ

# विद्यापीठात हुतात्म्यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज सकाळी अकरा वाजता दोन मिनिटे मौन व स्तब्धता पाळून महात्मा गांधी यांना तसेच हुतात्म्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठातील सर्व प्रशासकीय कक्ष तसेच विविध अधिविभागांत महात्मा गांधी यांच्या स्मृती दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. प्रशासनातर्फे मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीवरून सकाळी ठीक १०.५९ वाजता भोंगा वाजविण्यात आला. त्यानंतर ११ वाजता सर्वांनी आपापल्या जागी स्तब्ध उभे राहून दोन मिनिटे मौन पाळून महात्मा गांधी यांच्यासह हुतात्म्यांचे स्मरण केले.

31 JAN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भाषिक राजकारणापासून भाषेला जपण्याची गरज

## शिवाजी विद्यापीठातील परिसंवादामधील सूर; सातत्याने चिकित्सा हवी

कोल्हापूर, ता. ३० : 'भाषेचे वैभव टिकवून ठेवण्यासाठी तिला भाषिक राजकारणापासून जपण्याची आवश्यकता असते. त्यासाठी सातत्याने तिची मीमांसा, चिकित्सा केली पाहिजे', असा सूर शिवाजी विद्यापीठातील परिसंवादात आज उमटला.

विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यांतर्गत 'मराठी भाषेच्या उत्पत्ती विषयक सिद्धांतांची पुनर्मीमांसा' या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. अध्यक्षस्थानी मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख होते. रवींद्र इंगळे-चावरेकर यांनी मराठी भाषेची



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित मराठी भाषाविषयक परिसंवादात बोलताना रवींद्र इंगळे-चावरेकर. शेजारी डॉ. रणधीर शिंदे, नंदकुमार मोरे, आदी .

पुनर्मीमांसा करताना तिच्या प्रवासातील विविध प्रवाह, बदल, परंपरांचा नव्याने वेध घेण्याची गरज असल्याचे सांगितले. 'ब्रिटिश काळात मराठीविषयी भाषाशुद्धीच्या अनुषंगाने अधिक चांगले विचार मांडण्यात आले. भाषांमध्ये हा आंतरिक व्यवहारही समृद्धतेच्या दिशेने घेऊन जातो', असे डॉ. दिलीप चव्हाण यांनी सांगितले.

डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी शिलालेख, ताम्रपट, गद्यलेखन यांमधून मराठीची वेगवेगळी रूपे सापडतात. महाराष्ट्राबाहेरही लिहीत असणाऱ्या कवींचे प्राचीन साहित्य मराठीची विविध रूपे वेळोवेळी सामोरे आणण्याचे काम करीत असल्याचे सांगितले. डॉ. देशमुख यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठात होत असलेल्या या परिसंवादाचे दस्तावेजीकरण व्हायला हवे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी उपस्थितांचा परिचय करून दिला. यावेळी जी. पी. माळी, अनिल गवळी, मेघा पानसरे, प्रभंजन माने, अक्षय सरवदे, मानसिंग टाकळे, शरद गायकवाड, अरुण शिंदे उपस्थित होते. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JAN 2025

तरुण भारत

# शरण साहित्य अध्यासनातर्फे उद्या डॉ. अरविंद जत्ती यांचे व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात उद्या (दि.१) शरण साहित्य अध्यासनाच्या कार्यारंभानिमित्त बंगळुरू येथील बसव समितीचे अध्यक्ष डॉ. अरविंद जत्ती यांचे व्याख्यान होणार आहे. सकाळी १०.३० वाजता मानव्यशास्त्र हॉलमध्ये व्याख्यान होईल. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. तरी जास्तीत जास्त लोकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासनाच्या समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JAN 2025
सकाळ

# विद्यापीठात उद्या डॉ. अरविंद जत्ती यांचे व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात शनिवारी (ता. १ फेब्रुवारी) शरण साहित्य अध्यासनाच्या कार्यारंभानिमित्त बंगळूर येथील बसव समितीचे अध्यक्ष डॉ. अरविंद जत्ती यांचे विशेष व्याख्यान होणार आहे. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात डॉ. जत्ती हे 'शरण साहित्य : संकल्पना आणि प्रासंगिकता' या विषयावर व्याख्यान देणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि बसवकल्याण येथील अनुभवमंटपाचे अध्यक्ष डॉ. बसवलिंग पट्टदेवरू यांची प्रमुख उपस्थित असतील, अशी माहिती अध्यासनाच्या समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JAN 2025
लोकमत

# अरविंद जत्ती यांचे उद्या व्याख्यान

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात उद्या, शनिवारी शरण साहित्य अध्यासनाच्या कार्यारंभानिमित्त बंगळुरू येथील बसव समितीचे अध्यक्ष डॉ. अरविंद जत्ती यांचे व्याख्यान आयोजित केल्याची माहिती अध्यासनाच्या समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी दिली. शनिवारी सकाळी १०:३० वाजता मानव्यशास्त्र सभागृहात ते 'शरण साहित्य : संकल्पना आणि प्रासंगिकता' विषयावर मांडणी करतील. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व अनुभवमंटपाचे अध्यक्ष डॉ. बसवलिंग पट्टदेवरू उपस्थित राहणार आहेत. या व्याख्यानाला उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. करेकट्टी यांनी केले.

31 JAN 2025 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्त्री-भ्रूण हत्या रोखण्यात महिलांची भूमिका महत्त्वाची

■ कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे प्रतिपादन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत डॉ. प्रतिमा पवार, डॉ. प्रतिभा देसाई. तसेच समोर उपस्थित सहभागी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्त्री भ्रूण हत्या रोखण्यामध्ये महिलांची फार महत्त्वाची भूमिका आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाचे 'बेटी बचाओ अभियान' आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांकरिता 'राष्ट्रीय बालिका दिना'निमित्त वैद्यकीय गर्भपात कायदा आणि पोक्सो कायदा या अनुषंगाने एक दिवसीय कार्यशाळेत अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते.

कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, सामाजिक संतुलनासाठी स्त्री-पुरूष गुणोत्तर जपणे आणि कोणत्याही मुलीची गर्भातच हत्या न होऊ देणे, यासाठी प्रत्येक नागरिकाने आपापल्या स्तरावर दक्षता घेतली पाहिजे. समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रतिमा पवार म्हणाल्या, मुलांचे संगोपन करताना त्यांच्यात मुलगा-मुलगी अशा भेदभावाला स्थान देता कामा नये. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगले यांनी प्रत्येक गावामध्ये या दोन्ही कायद्यांबाबत जागरूकता वाढण्याचा प्रयत्न करावा, असे सांगितले. कार्यशाळेत ॲड. गौरी पाटील यांनी वैद्यकीय गर्भपात कायद्याविषयी तर आणि समाजसेविका गौरी हसूरकर यांनी पोक्सो कायद्याविषयी माहिती दिली. बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सुप्रिया वडर आणि योगेश कर्चे यांनी सूत्रसंचालन केल. डॉ. योजना पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JAN 2025
सकाळ



वसगडे (ता. करवीर) : येथे विवेकानंद कॉलेजच्या श्रमसंस्कार शिबिर सांगता समारंभात बोलताना डॉ. टी. एम. चौगुले व मान्यवर.

# वसगडेत विवेकानंदच्या श्रमसंस्कार शिबिराची सांगता

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा आणि नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्त्वाची आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. एम. चौगले यांनी व्यक्त केले. विवेकानंद महाविद्यालयाच्या वसगडे (ता. करवीर) येथे सुरू असलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार अध्यक्षीय भाषणात म्हणाले, 'एनएसएसच्या शिबिरातून विद्यार्थ्यांनी स्वतःचा शोध घ्यावा.' या शिबिरासाठी हितेंद्र साळुंखे, रजिस्ट्रार आर. बी. जोग, एस. पी. देसाई, ई. जी. मंगल, आर. एम. बोंगे, सदानंद दुर्गुळे यांचे सहकार्य लाभले. यावेळी प्रा. एस. पी. थोरात, प्रा. राजश्री पाटील, डॉ. बी. टी. दांगट, डॉ. संपदा टिपकुर्ले, प्रा. सी. सी. पाटील, प्रा. नयना पाटील उपस्थित होते. प्रा. पी. आर. बागडे, कार्यक्रम अधिकारी यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. सुयश झुणके यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जी. एस. उबाळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JAN 2025

तरुण भारत

# सोनम लव्हटेची शिवाजी विद्यापीठ महिला रग्बी संघामध्ये निवड



कोलोली : श्रीपतराव चौगुले आर्टस् अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी–कोतोली ता पन्हाळा येथील बी.ए.भाग दोनची विद्यार्थिनी सोनम संतोष लव्हटे हिची शिवाजी विद्यापीठ महिला रग्बी संघामध्ये निवड झाली आहे, अशी माहिती संस्थेचे सचिव शिवाजी पाटील यांनी दिली. भुवनेश्वर ओडीसा येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला रग्बी स्पर्धेमध्ये तृतीय (कांस्यपदक) क्रमांक पटकावला. विद्यार्थ्यांना संस्थेचे संस्थापक–अध्यक्ष व जि. प. चे माजी बांधकाम व आरोग्य समिती सभापती डॉ.के.एस.चौगुले, प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील,कोल्हापूर रग्बी फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष अमर सासणे, सचिव दीपक पाटील, प्रा.राहुल लहाने व जिमखाना प्रमुख शारीरिक शिक्षण संचालक प्रा.संग्रामसिंह मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.